# Visual MELODY

E-MAGAZINE ABOUT VISUAL ARTS IN FREE INDIA
By: Ravi Paranjape Foundaion

Volume 14 - Quarterly Issue - 1st June 2023



**COVER STORY**
Eminent Indian Sculpture
Shri. Madan Garge

All paintings and illustrations used in this issue are duly acknowledged.

***"Absorb the beauty and present it beautifully"***

*Ravi Paranjape*

# Visual MELODY

*Visual Melody is a content rich e-magazine offered by 'Ravi Paranjape Foundation', dedicated to visual art. Delve into the sumptuous art world of brilliant artists, discover various facets of visual arts.*

*This FREE e-magazine is published quarterly in Marathi and English.*

*Visual Melody **FREE** subscription link:*
*www.bit.ly/rpfvisualmelody.*

***Ravi Paranjape Foundation***
*'Ravi Paranjape Foundation' is established by Ravi & Smita Paranjape in 1996 with the objective of promoting 'Design-based Culture' as envisioned by Artist Ravi Paranjape, and building art literate community, through various initiatives run by the Ravi Paranjape Foundation.*

***Credits***
*Editor: Rahul Deshpande*
*Art Direction: Sunil Gokarn*
*Design : Vinayak Chhatre*

*1, Rutika Apartments, 1098/5-A, Model Colony,*
*Shivaji Nagar, Pune - 411016*

*+91 942 356 2530*
*www.raviparanjape.org*
*abhijatkala@gmail.com*

*All published information and images in this e-magazine are duly acknowledged and copyright protected by the respective parties.*
*This e-magazine is free to share as is. No part of this e-magazine shall be reproduced OR shared in parts OR used in any other way than intended.*



# गर्गे आर्ट स्टुडिओ

रवि परांजपे फाऊंडेशन तर्फे 'गुणिजन कला पुरस्काराने गौरवांकित केलेले ज्येष्ठ शिल्पकार कै. श्री. मदन गर्गे व त्यांच्या पत्नी श्रीमती अरुणाताई गर्गे यांनी व्यावसायिक शिल्पकलेच्या क्षेत्रात केलेले भरीव योगदान राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर वाखाणले गेले आहे.

शिल्पकार कै. मदन गर्गे यांचे वडील काका यांचेपासुन सुरु झालेली कलापरंपरा आज त्यांच्या तिसऱ्या पिढीतील तीन भावंडे अरुणाताईंच्या मार्गदर्शनाखाली समर्थपणे सांभाळत आहेत. सन १९२३ ते २०२३ असा 'गर्गे आर्ट स्टुडिओ' चा शतक महोत्सवी प्रवास या वर्षी साजरा होत आहे. त्यानिमित्ताने हा अंक 'गर्गे आर्ट स्टुडिओ'च्या शतकमहोत्सवी योगदानाला समर्पित आहे.

या प्रवासाच्या सक्रीय साक्षीदार ज्येष्ठ चित्रकार; शिल्पकार अरुणाताई गर्गे यांच्याशी चित्रकार गोपाळ नांदुरकर यांनी केलेल्या बातचितीतून हा प्रवास उलगडत जात आहे.

– मुलाखतकार, चित्रकार गोपाळ नांदुरकर

**गोपाळ:** अरुणाताई प्रथम मगर्गे आर्ट स्टुडिओ’च्या शतकमहोत्सवाप्रीत्यर्थ हार्दिक अभिनंदन! आम्हाला या प्रवासातील पहिल्या कालखंडाबद्दल सांगा.

**अरुणाताई :** मागच्या वर्षी आमच्या जुन्या कागदपत्रात एक पावती सापडली व त्या पावतीवर ’गर्गे आर्ट स्टुडिओ’– स्थापना १९२३ असा उल्लेख आढळला. त्यामुळे ही गोष्ट स्पष्ट झाली की यंदा २०२३ साली स्टुडिओला १०० वर्षे पूर्ण होत आहेत. जेव्हा ही बाब आप्त–मित्रांना सांगितली तेव्हा त्या सगळ्यांनी आनंद व्यक्त केला व त्यानिमित्त काही कार्यक्रम व्हायला हवा अशी इच्छा व्यक्त केली. आम्ही त्यादृष्टीने नियोजन करीत आहोत. परांजपे सरांच्या या कलाविषयक त्रैमासिकातून स्टुडिओच्या योगदानाची दखल घेतली जात आहे ही आमच्यासाठी अभिमानास्पद गोष्ट आहे व प्रथम मी त्यासाठी मनःपूर्वक आभार मानते.

माझे सासरे कै.श्री. ग. ना. गर्गे हे नाशिक परिसरात ’आर्टिस्ट’ या उपाधीनेच संबोधले जायचे. ते एक हरहुन्नरी कलावंतच होते. खरे तर त्यानी कोणत्याही प्रकारचे औपचारिक कलाशिक्षण घेतलेले नव्हते पण उपजत कलागुणांना नक्कीच त्यांनी विविध प्रकारे संस्कारित केले असणार कारण त्याशिवाय उत्तम व्यावसायिक दर्जाचे काम करणे अवघडच ठरले असते. ते व त्यांचे दोन भाऊ त्यावेळी ’गर्गे आर्ट स्टुडिओ’ ची जबाबदारी सांभाळत होते.

**गोपाळ :** आपले सासरे व दोन चुलत सासरे यांच्याद्वारे कोणत्या स्वरूपाची कलात्मक कामे होत होती?

**अरुणाताई :** माझे सासरे हे नाशिक परिसरातील आद्य छायाचित्रकारांपैकी एक होते व त्यासाठी नावाजलेले होते. आमच्या स्टुडिओत त्याकाळाला साजेशी छायाचित्रणाची सामुग्री म्हणजे मागचे पडदे, खुर्च्या, हात ठेऊन उभे राहण्यासाठी कलात्मक स्टँड, फुलदाण्या वैगेरे सर्व साहित्य होते व फोटो काढण्यासाठी लांबलांबून सहकुटुंब मंडळी येत. जेव्हा मुबलक सुर्यप्रकाश असेल तेव्हा स्टुडिओतील छपराचे दोन पत्रे काढले जायचे व त्या प्रकाशात फोटोग्राफी होत असे. जेव्हा ढगाळ वातावरण असेल तेव्हा बरीच प्रतिक्षा करावी लागे. असा फोटो काढणे हा एक सोहळाच असायचा. नाशिकच्या त्या काळात काँग्रेसचे राष्ट्रीय अधिवेशन झाले होते व त्याला खूप मोठे नेते आले होते, त्यावेळी माझ्या सासऱ्यांनी खूप छायाचित्रे घेतली होती. पण दुर्दैवाने ती ऐतिहासिक छायाचित्रे काळाच्या ओघात जतन होऊ शकली नाहीत.



फोटोग्राफी बरोबरच 'Taxidermy' म्हणजे पेंढा भरलेले पक्षी व प्राणी तयार करणे या कलेतही ही मंडळी निष्णात होती. त्यासाठी शिकार केलेले पक्षी व प्राणी आणले जायचे, त्यांचे कातडे काळजीपूर्वक काढून घेऊन त्यावर जतन योग्य प्रक्रिया करणे व नंतर त्या पक्ष्यांचा किंवा प्राण्यांचा सुयोग्य प्रमाणबद्ध ढाचा तयार करून त्यावर ते मुळ कातडे बसवणे अशा प्रकारे ही पुर्ण प्रक्रिया ते करत असतं. असे प्राणी, पक्षी मग शाळा–महाविद्यालयांत व संग्रहालयांना दिली जात.

त्या बरोबरच माझे सासरे गणपतीच्या मूर्ती करत असत हे शिक्षण पण त्यांनी निरीक्षण व अनुभवातून मिळवलं होतं. अल्पावधितच त्यांच्या मूर्ती खुप नावाजल्या गेल्या व त्यांना मागणीही लाभली. तसेच संगमरवर व धातुतील मूर्ती/पुतळे व संगमरवरावरील कोरीव फलक हे पण आमच्या स्टुडिओत केले जायचे. माझे सासरे व त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे दोन भाऊ हे स्टुडिओची जबाबदारी सांभाळत होते पण १९५४ साली सासऱ्यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आणि स्टुडिओचा मोठा आधारच नाहीसा झाला.

त्यावेळी माझे पती मदन गर्गे हे फक्त दुसरीत शिकत होते. ते सर्वात धाकटे, त्यांच्यापेक्षा दोन मोठे भाऊ होते. वडिलांच्या अकस्मित निधनानंतर त्यांच्या मावशीने मदन यांच्या शिक्षणाची जबाबदारी स्विकारली व त्यांना मुंबईला घेऊन गेल्या. तिथे वडिलांचे छत्र हरपलेल्या 'मदन' यांना काहीशा हाल-अपेष्टा सहन करतच व कष्ट करतच शालेय शिक्षण पूर्ण करावे लागले. पण त्यांचे कलागुण त्यांच्या आईने ओळखले होते व पुढे मोठा झाल्यावर 'मदन' हे सारे काम पुढे नेईल या आशेवर त्यांनी स्टुडिओची जागा कसोशीने जपून ठेवली होती.

**गोपाळ :** अरुणाताई मग मदन गर्गे सरांचे शिल्पकलेचे शिक्षण कसे झाले?

**अरुणाताई :** हे जेव्हा दहावी झाले तेव्हा मुंबईला असलेल्या सुप्रसिद्ध व ज्येष्ठ शिल्पकार करमरकर यांच्या संपर्कात होते कारण करमरकर हे माझ्या सासऱ्यांचे मित्र होते. मित्राचा मुलगा म्हणून त्यांना ह्यांच्याबद्दल आस्था होती. मदन यांनी करमरकरांना विनंती केली की आपल्या स्टुडिओत मी पडेल ते काम करेन व आपण मला शिल्पकला शिकवा. पण करमरकरांनी त्यास नकार दिला कारण असे शिक्षण एकांगी होईल, त्यापेक्षा जे. जे. स्कूल ऑफ आर्टस् मधील शिक्षणातून तुला शिल्पकलेचे सर्व आयाम समजतील असा सल्ला करमरकरांनी दिला व हे जे.जे. स्कूल ऑफ आर्टस् च्या शिल्पकला



विभागात शिक्षणासाठी दाखल झाले. पण त्या कालखंडात ह्यांनी एक कलावंत म्हणून अनेक प्रकारचे ज्ञान व संस्कार आत्मसात केले. त्यांच्या कामाची वाखाणणी झाली व एकप्रकारे त्यांच्यातला कलावंत सर्वार्थाने घडण्याचा तो कालखंड होता.

**गोपाळ :** अरुणाताई आता कलाकारकिर्दीच्या वाटचालीबद्दल जाणून घेण्याआधी मला आपल्या दोघांच्या सहजीवनाची सुरुवात कशी झाली त्याबद्दल सांगा कारण तुम्ही मूळतः ड्रॉईंग अँड पेंटिंग या विषयाचे शिक्षण घेतले होते मग शिल्पकलेचा प्रवेश तुमच्या आयुष्यात कसा झाला?




**अरुणाताई :** माझी एक मैत्रिण होती व तिच्या आर्टस् टिचर कोर्सच्या अभ्यासक्रमात क्ले मॉडलिंग हा एक विषय होता. त्याविषयी माहिती व सराव मिळवण्यासाठी आम्ही दोघी गर्गे स्टुडिओत गेलो व तेथे मदन गर्गे व माझी प्रथम भेट झाली. थोडा परिचय झाला मग मैत्रिणीची परिक्षेपुरती गरज संपल्यावर ती येण्याची बंद झाली पण माझे येणे जाणे सुरू राहिले व ह्यांनी काही शिल्पकृतीच्या रंगकामाची जबाबदारी मला दिली. हळुहळू सहवास वाढत गेला व आम्ही एकमेकांना जीवनसाथी म्हणून निवडले व आमचा प्रेमविवाह होऊन मी कु. अरुणा चितळे ही सौ. अरुणा मदन गर्गे झाले आणि खऱ्या अर्थाने आमचे कलात्मक सहजीवन व संसार सुरु झाला.

सुरुवातीचा कालखंड हा कलाकारकिर्दीच्या दृष्टीने खूपच संघर्षमयच होता. मी त्याच काळात यांच्या मार्गदर्शनाखाली शिल्पकलेतील बारकावे व मुख्यतः मातीकामाचे कौशल्य आत्मसात करत होते. पण त्या काळात शिल्पकलेची कामे अत्यल्प स्वरूपातच येत होती. बाकी मग देवदेवतांच्या मूर्ती अथवा काही किरकोळ कामे मिळत. तसा सासऱ्यांचा गणपतींचा व्यवसाय होताच. आम्ही दोघांनी मिळून सुरुवातीची पंधरा–सोळा वर्ष हा व्यवसायच मोठ्या प्रमाणात केला व गणपतींच्या उत्सवातील हलते देखावे व मोठ्या आकाराच्या मूर्ती या प्रकारात खूप काम केले. अगदी झोकून देऊन काम करावे लागे व काळ, काम, वेग यांची सांगड घालणे हे मोठे आव्हान असे. त्याकाळात दिवसरात्र मेहनत होत असे व इतर शिल्पकलेची कामे बंदच ठेवावी लागत पण असे चालू असताना एक गोष्ट जाणवली की आपण गणपतीची कामे पूर्ण बंद केल्याशिवाय आपल्याला शिल्पकलेला योग्य न्याय देता येणार नाही. अर्थात यात धोका होताच की आपण येणाऱ्या व्यवसायाला नाकारतो आहोत. पण तो कठोर निर्णय घेणे आम्हाला आवश्यक वाटले व आम्ही गणपतींची कामे पूर्णपणे थांबवली व शिल्पकलेतील काही सृजनशील संधी मिळते का याची प्रतिक्षा करू लागलो.

**गोपाळ :** अरुणाताई कोणत्याही कलावंताला आपल्या व्यावसायिक कामातून सुद्धा कलात्मक दर्जा, आपली गुणवत्ता, आपल्या प्रतिभेच्या अविष्कार, कलेसाठी त्याने केलेली साधना व या सर्वांच्या मिलाफातून स्वतःची ओळख निर्माण करण्याची आंतरिक उर्मी असते तर आपल्या दोघांचा हा प्रवास कसा होता?






RGE ART STUDIO



**अरुणाताई :** कारकिर्दीच्या पहिल्या कालखंडात आम्ही जी कामे करत होतो म्हणजे गणपतीचा व्यवसाय बंद केल्यावर सुरुवातीला काही कामे ब्रॉन्झ धातूतली तर काही फायबर माध्यमात केली होती. कारण काम देणाऱ्या मंडळींचे बजेट कमी जास्त असते त्याप्रमाणे माध्यम ठरते. त्यावेळी छ. शिवाजी महाराजांचे अश्वारूढ शिल्प व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पूर्णाकृती शिल्प वगैरे स्वरूपाचे काम होत होते. तेव्हा १९९३ साली पिंपरी–चिंचवड महानगरपालीकेतर्फे 'शक्ती–भक्ती' शिल्पसमुहाबद्दल जाहिरात आली होती व आम्हाला हा विषय खूप आव्हानात्मक वाटला व आम्ही संकल्पशिल्पावर काम सुरु केले. तुला माहित आहे की या शिल्पसमुहाची संकल्पना श्री शिवाजी महाराज व श्री. तुकाराम महाराज यांच्या भेटीप्रसंगावर आधारित आहे. पण ही दोन व्यक्तींची भेट नाही तर महाराष्ट्रातील धारकरी व वारकरी म्हणजे शक्ती व भक्ती यांचा हा समन्वय आहे. हे दोन्ही महान थोर पुरूष हे या शक्ती–भक्तीचे मार्गदर्शक दिपस्तंभ आहेत व होते. त्यांच्या प्रेरणेने जागृत झालेल्या महाराष्ट्र देशाचे दर्शन या शिल्पसमुहातून घडवावे असा आमचा मानस होता. त्यादृष्टीने आम्ही उभयतांनी शिवरायांचा इतिहास व तुकोबांची गाथा अशा विषयांचे वाचन, मनन, चिंतन केले व त्या साऱ्याच्या परिपाकातून आमचे संकल्पशिल्प लहान आकारात साकार झाले आणि त्या शिल्पाची निवड सर्वानुमते एकमताने झाली. इतर शिल्पकारांच्या संकल्पशिल्पापेक्षा आमच्या कलाकृतीतील व्यापक आशय सर्वांनाच भावला व आम्ही हे भव्य शिल्प साकारण्याची रूपरेषा आखली व कामाला सुरुवात केली. १९९५ ते २००० सालापर्यंत म्हणजे अखंड पाच वर्षांचा काळ हे भव्य शिल्प निर्माण होण्यासाठी गेला. याच काळात वारणानगरचे उद्योगमहर्षी तात्यासाहेब कोरे यांच्या व्यक्तीशिल्पासाठी त्यांनी आम्हाला वारणानगरला आमंत्रित केले व तेथील त्यांचे सर्वांगीण विकासकार्य पाहून आम्ही श्री. कोरे यांच्या व्यक्तीमत्त्वाच्या खाली गोलाकार रचनेचे एक प्रतिकात्मक कॉम्पोझिशन तयार केले व त्याद्वारे वारणानगरची उज्ज्वल वाटचाल दाखवण्याचा प्रयत्न केला, आणि यामुळे ते फक्त एका व्यक्तीचे व्यक्तिशिल्प न रहाता त्या व्यक्तीच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख मांडणारी एक कलाकृती ठरली. अशा प्रकारे व्यावसायिक कामाला एक कलात्मक परिमाण देण्याचा हा प्रयत्न

खूप यशस्वी झाला व समाजातील सर्व थरातील कलारसिकांनी त्याला भरभरून दाद दिली. सन २००० साली सहस्त्रकाच्या शेवटच्या वर्षी 'शक्ती–भक्ती' व वारणानगरचे समूहशिल्प ह्या दोन्ही शिल्पांचे अनावरण झाले. हा आमच्या कारकिर्दीतील एक सुयोग होता. 'शक्ती–भक्ती' शिल्प पिंपरी चिंचवड महानगरपालिका व निगडी प्राधिकरणाच्या हद्दीत मुख्य रस्त्यावरूनही रसिकांना पाहता येते व ते शहराचा सांस्कृतिक मानबिंदू ठरले आहे.

**गोपाळ :** अरुणाताई त्यानंतर आपल्याला अमेरिकेतील कॅलिफोर्निया राज्यात रिव्हरसाईड या शहरात बसवले जाणारे महात्मा गांधीचे शिल्प साकारण्याची संधी लाभली त्याविषयी सांगा.

**अरुणाताई :** हो ! त्यासंदर्भात प्रथम काही कॅलिफोर्नियास्थीत भारतीय मंडळी आमच्या स्टुडिओत आली व त्यांनी थोडे व्हिडिओ शुटींग करून घेतले व गांधीजींच्या शिल्पाबद्दल संकल्पना सांगितली त्यांना नेमके फक्त गांधीजींचे व्यक्तीशिल्प अपेक्षित नव्हते तर गांधींचे जीवन, त्यांचे तत्त्वज्ञान, त्यांचे मार्गदर्शन याबाबत काही कथन करणारे शिल्प त्यांना हवे होते. आम्ही त्या दृष्टीने शिल्पसंकल्पनांचे नमुने तयार केले व त्यांचे फोटो पाहून त्यांना सर्वच संकल्पना आवडत्या व सर्व नमुन्यांसह त्यांनी आम्हाला निमंत्रण दिले. सर्व लवाजमा घेऊन आम्ही तिथे पोहोचलो तेव्हा रिव्हरसाईड सिटीतील विविध घटकांशी आमच्या पाच मिटिंग झाल्या व शेवटची सहावी मिटिंग त्यांच्या 'मेयर' (महापौरां) सोबत झाली. सर्वानुमते आमची एक शिल्पसंकल्पना निवडली गेली. हा परदेश दौरा खूप काही नवीन शिकवणारा व समृद्ध करणारा ठरला. आम्ही निवडक शहरे व म्युझियम्स पण पाहिली व नंतर गांधीजींचे संकल्पशिल्प त्या शहरात विराजमान झाले.

**गोपाळ :** अरुणाताई आपला ह्या कलाप्रवासात एक प्रगल्भ टप्प्यावर असतानाच २००८ साली एका दुर्दैवी अपघातात शिल्पकार मदन गर्गे आपल्याला सोडून गेले व आपण पण त्या अपघातात गंभीर जखमी झाला होतात. सरांचे जाणे ही आपल्या देशाच्या कलाक्षेत्राची फार मोठी हानी होती व तो धक्का फार मोठा होता. सर्वांनाच त्यातून सावरणे खूप कठीण गेले. आपण तर दीर्घ उपचार व शस्त्रक्रियांना सामोऱ्या गेलात व हा आघात पचवून पुन्हा गर्गे आर्ट स्टुडिओची धुरा सांभाळू लागलात. आपला मुलगा श्रेयस व पुतणे मंदार व मिलींद यांच्या सहकार्याने आजही ही वाटचाल सुरु आहे. आपले हे योगदान आमच्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहे.



आता मला आपले काही कलाविषयक विचार जाणून घ्यायचे आहेत. आपण मूलतः चित्रकार होता व नंतर शिल्पकलेकडे वळलात तर या दोन्ही कलांकडे आपण कशा पाहता?

**अरुणाताई :** मी पेंटिंगचे शिक्षण घेतले व आता भविष्यात याच क्षेत्रात आपण काम करू असं मला वाटलं होतं पण एका शिल्पकाराबरोबरचं सहजीवन सुरु झाल्यावर जबाबदारी घ्यायला सुरुवात केली व मी ती पूर्ण करत गेले. काही वेळा मी त्यांना म्हणायचे की 'मी पेंटिंग्ज कधी करू' त्यावर ते म्हणायचे, रिटायर्डमेंटनंतर कर पण अजुनही मी या कामातून निवृत्त झालेलीच नाही! पेंटिंग व शिल्प यात मला असा फरक वाटतो की बऱ्याचदा पेंटिंग करताना सर्व तपशील रंगवले जातातच असे नाही चित्र हे द्विमीतीजन्य असल्याने त्यात त्रिमितीचा आभासच निर्माण केलेला असतो पण शिल्प हे ३६०° अंशांनी पाहीले जाते त्यामुळे त्यातील सर्व तपशील व बारकावे समजून घेऊन ते पूर्ण करणे आवश्यक ठरते. माझ्या ड्रॉईंगचा मी शिल्पकलेच्या दृष्टीने विचार केला तेव्हा असे जाणवले की शिल्प म्हणजे ३६०° अंशातले ड्रॉईंगच आहे. सगळ्या अंगांनी दिसणारे ड्रॉईंग एकत्र होऊन शिल्प साकार होते.

**गोपाळ :** अरुणाताई आपण उभयता व्यावसायिक शिल्पकलेच्या क्षेत्रात कार्यरत होतात. पण आपल्या सर्व कामात आम्हाला दर्जात्मक गुणवत्तेसोबतच सौंदर्यवादी दृष्टीकोन दिसतो व स्वप्रतिमेने साकारलेली कलामुल्ये जाणवतात तर याबाबत आपली वैचारिक भूमिका काय आहे? आपल्या कलाकृतीतून जीवनातले व कलात्मकता असे दोन्हीही सौंदर्य कसे प्रतीत होते?

**अरुणाताई :** हो! हे अतिशय महत्वाचे मुद्दे आहेत. सौंदर्य या शब्दाचा विचार केला तर ती सौंदर्यदृष्टी मदन गर्गे ह्यांच्याकडे खूप होती व कलाकृती अधिकाधिक सुंदर व सौष्ठवपूर्ण करण्याची त्यांना आवड होती व ते सौंदर्य किती सहजतेने व अभिरूचीपूर्ण असे त्या देहबोलीतून व्यक्त करता येईल हे ते पहात असत व मला सहजतेने पण जोशपूर्ण व प्रेरणादायी असे प्रवाही काम करायला आवडायचे व आम्ही दोघे जेव्हा मातीकाम करायचो तेव्हा प्रथम मी माझ्या पद्धतीने ब्लॉकींग करून घ्यायचे व नंतर हे त्यांच्या दृष्टीने त्यावर काम करत. त्यातील सौंदर्यतत्व घडवत असत व त्यांचे पूर्ण समाधान होईपर्यंत ते काम करीत व नंतरच मोल्ड टाकला जाई. इथे असे पहा ते पुरूष असल्याने त्यांना स्वाभाविकपणे स्त्रीतील सौंदर्यतत्वाचे आकर्षण होते व एक स्त्री म्हणून मला पुरुषातील सौष्ठव व जोशपूर्ण अभिव्यक्तीचे आकर्षण होते व अशा परस्परविरोधी तत्वांचा मिलाफ अनायसेच आमच्या कामातून होत होता.





ही झाली कलात्मक बाजू पण जेव्हा आपण समाजासाठी काम करतो आहोत व आपले काम समाजाच्या डोळ्यापुढे सतत असणार आहे तेव्हा त्या कामाचा सकारात्मक परिणामच समाजावर घडायला हवा ह्या बाबतीत आम्ही कायमच आग्रही होतो व आहोत.

एका वेगळ्या व्यापक अर्थाने बोलायचे झाल्यास एक शिल्प ही जमिनीवरची कालकुपी असते. उद्या भविष्यात प्रलय होऊन हे शिल्प भूगर्भात गाडले गेले व पुढे अनेक वर्षांनी पुन्हा सापडले तर ते शिल्प स्वतःच्या भाषेत तेव्हाच्या मानवाशी बोलेल त्याला भाषेचे शब्दांचे बंधन असणार नाही आणि त्या शिल्पात साठवलेली शाश्वत मूल्ये, अभिजातता तेव्हा सुद्धा प्रगट होईल. अशी उदाहरणे आपण मानवी इतिहासात अनेकदा पाहिलीच आहेत.

शिल्पकलेतील कलात्मक सामुग्रीचा वापर करून जर तुम्ही काही भावना व्यक्त करण्याचा प्रयत्न केलात तर ती कलाकृती निश्चित वेगळी ठरते व या भावना जर उदात्त व प्रेरणादायी अशा वैश्विक मूल्यांचे दर्शन घडवणाऱ्या असतील तर स्थल-कालाच्या मर्यादेच्या पलिकडे जाऊन ते शिल्प कायमच अभिजात कलाकृती ठरेल. मला वाटतं येणाऱ्या नव्या पिढीतील शिल्पकारांनी सुद्धा असाच प्रयत्न करायला हवा.

**गोपाळ :** अरुणाताई, येथे आपण अतिशय व्यापक असा विचार नवोदितांसाठी व्यक्त केला आहे व मला वाटतं त्याचे अनुकरण कोणत्याही चित्र-शिल्पकाराने आपल्या सृजनप्रवासात नक्कीच करायला हवे. अरुणाताई सरांच्या पश्चातही आपण अजून कार्यरत आहात व गर्गे स्टुडिओची तिसरी पिढी आपल्याला साथ देत आहे. मला इथे नमूद करायला आवडेल की आपले चिरंजीव, पुरातत्वशास्त्रज्ञ डॉ. तेजस गर्गे हे महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयात पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयात संचालक पदावर कार्यरत आहेत. आपण उभयतांनी कलाक्षेत्रात जे योगदान दिले ते अनेकांना कायमच प्रेरणा देत राहणार आहे. आता तुमच्या मनात काय संकल्प सुरु आहेत?

**अरुणाताई :** हे बघ ! कोणताही कलावंत हा कधीच समाधान पावला असे होत नाही कारण कलेचे क्षितीज सतत लांब लांबच दिसतं असते व आपली वाट कधीच संपत नसते. मलाही तीच भावना जाणवते की प्रवास अजून खूप लांबचा आहे. एक म्हणजे आपल्या भारतीय शिल्पशैलीचे आकर्षण पण खूप वाटते. त्याबाबत खरोखर म्हणावे तसे काम होत नाहीये व ती शैली विकसित होण्यासाठी तिचे सुयोग्य शिक्षण मिळण्याची पण सोय नाही. अशी व्यवस्था उभी रहावी असे खूप मनापासून वाटते. पण ते माझ्या एकट्याचे काम नाही. मोठ्या प्रमाणात त्याला उर्जा लाभायला हवी.

**गोपाळ :** अरुणाताई शेवटी मी आपले मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. गर्गे आर्ट स्टुडिओची शतकमहोत्सवी वाटचाल व त्यातील आपण एक महत्त्वपूर्ण दुवा आहात. तुम्ही हा संवाद साधल्यामुळे आम्हाला खूप नवीन गोष्टी समजल्या. आपल्या स्टुडिओच्या भावी वाटचालीस शुभेच्छा व आपल्याला उत्तम आयुरारोग्य लाभो ही श्रीचरणी प्रार्थना ! आदरणीय कै. श्री. मदन गर्गे सरांच्या प्रेरणादायी स्मृतींना विनम्र वंदन करून आपण ही मुलाखत पुरी करु ! धन्यवाद !





# Garge Art Studio

An institution established by Sculptor Shri Madan Garge's father and uncle has successfully thrived under the skillful stewardship of Arunatai Garge. 'Garge Art Studio' is celebrating the Centennial in 2023.

Shri. Madan Garge and Arunatai Garge's contribution to the field of art has been internationally acclaimed. Ravi Paranjape Foundation felicitated Sculptor Late Shri. Madan Garge with 'K.R. Paranjape Gunijan Kala Puraskar' in year 2006 for his significant contribution to visual arts.

In this issue of Visual Melody, Artist Gopal Nandurkar is taking us on an exciting ride through 'Garge Art Studio' with Arunatai Garge.

English Transcription by
Varsha Pendse

"*A true* ***Artist*** *is never really* ***satisfied.***"



**Gopal –** Namaskar Arunatai, thank you for taking time to talk to me today about 'Garge Art Studio'. Heartiest congratulations to you and the Garge family on the hundredth anniversary of the founding of Garge Art Studio. Please tell us little about the early years of Garge Art Studio.

**Arunatai –** Thank you Gopal. First of all, we realized that we will be celebrating hundredth birthday of our studio when we unexpectedly found an old receipt in our achieved paperwork, where it was mentioned 'Garge Art Studio – Founded in 1923'. Our friends and family members were extremely happy about this discovery and wanted us to commemorate this historic event. I am extremely pleased and thankful that Ravi Paranjape Foundation is featuring the story of Garge Art Studio in their quarterly publication 'Visual Melody'.

My father-in-law Late Shri G.N. Garge was known simply by his nickname 'Artist' in Nasik and surrounding area. He didn't have any formal art education but he must have carefully cultivated his natural gift otherwise it wouldn't have been possible to produce this kind of professional quality work. His two brothers were also sharing the responsibility of Garge Art Studio with him.







**Gopal –** What kind of work was being done at the studio by the three Garge brothers?

**Arunatai –** My father-in-law was one of the early and well-known photographers in Nasik area. Our studio was equipped with all sorts of popular props of that time like long curtains, chairs, standing arm-rests, large vases etc. Many families near and far visited the studio for taking pictures. Two roof sheets used to be removed to let the sunlight in to provide lighting for photography on a sunny day, but getting enough light on a cloudy day posed a big challenge for shooting photos.

National Conference of Congress was hosted in Nasik sometime during that timeframe. My father-in-law took many pictures of prominent political personalities of that time but unfortunately, those pictures were lost in efflux.

All three brothers were expert taxidermists too! Hunted animals and birds were sent to them for preservation. They skillfully removed and treated the outer skin of the animal or bird and replaced it on a carefully crafted mould of the original shape to recreate the same animal or bird. Most of such specimens went to educational institutes or museums.













My father-in-law had also mastered the art of crafting 'Ganapati' idols simply by observing and self-learning. His idols became popular within no-time increasing their demand. Other artistic products like metal and marble statues, carved marble plaques etc. were also crafted in the studio. My father-in-law's two younger brothers were working under his guidance in the studio. Unfortunately, he passed away unexpectedly in 1954, leaving a huge void in the family and the studio's future.

My husband Madan was the youngest of three siblings, and was only in second grade when he lost his father. His maternal aunt took the responsibility of young Madan's education and brought him to Mumbai. He completed his education under rather unfavorable conditions. His mother had deep faith in Madan's artistic ability and she held on to the studio in a hope that someday Madan will carry the studio's responsibility on his shoulders.

**Gopal –** Arunatai can you talk about Shri Garge's formal education in sculpture art.

**Arunatai –** After completing matriculation, he contacted legendary sculptor Karmarkar for work. Madan was ready to do any work at his studio to earn the tutelage of Artist Karmarkar in sculpture art. Artist Karmarkar was my father-in-law's friend and was fond of Madan and his work, however he turned down Madan and advised him to seek formal art education. Owing to Artist Karmarkar's advice Madan enrolled in the sculpting department at Sir J.J. School of Art in Mumbai. Madan was hugely benefited by art education received at Sir J.J. School of Art. His artistic outlook was much enriched during this time, earning him a lot of praise for his work from the teachers. This period was crucial for Madan's artistic development.







**Gopal –** Let me turn to you Arunatai. I am curious to learn about how you two started your artistic and personal journey together. You also formally studied drawing and painting. How did you turn to sculptures?

**Arunatai –** One of my friends had to learn 'clay modeling' when she was studying for art teacher's course. We both visited Garge Art Studio to learn more and may be get some experience, where I met Madan for the first time. My friend stopped visiting the studio after fulfilling the course requirement but I continued frequenting the studio. Soon Madan gave me responsibility of painting some sculptures. Slowly our acquaintance turned into tender relationship and I soon became Aruna Madan Garge from Aruna Chitale, truly embarking on the artistic journey together. Initially we struggled a lot. I was learning and absorbing the art and skill of clay sculpting under Madan's guidance.

We didn't receive much sculpting assignments in those days except some religious idols and similar work. Garge Art Studio had ongoing traditional business of 'Ganapati' idol making which my father-in-law had started. We also joined in the same trade and crafted Ganapati idols for almost sixteen years. We worked on a range of projects including building decorative moving 'scenes' for Ganesh festivals and making large size idols. We worked day and night during Ganesh festival. We had to fully devote to the Ganapati season keeping any other commercial sculpting assignments on hold. We realized that we cannot do full justice to our passion for sculptures until we fully stop Ganapati idol making. We finally took the plunge and got out of Ganapati making business with full awareness of the risk of losing business when looking for the creative sculpting opportunities.











**Gopal –** Artists strive to make their own identity through their work maintaining the artistic values, integrity and creativity through hard work and self-realization. How was your journey from this perspective?

**Arunatai –** Initially, after we stopped the Ganapati idol making, we made sculptures in bronze or fiber, depending on the budget of the customer. We were also working on full statue of Shivaji Maharaj mounted on the horse and the full figure statue of Dr. Babasaheb Ambedkar.

In 1993 Pimpri-Chinchvad Mahapalika announced a sculpture project called 'Bhakti-Shakti'. We found the topic challenging and interesting so we started working on the prototype. You may have seen the completed 'Bhakti-Shakti' project with the idols of Shivaji Maharaj and Sant Tukaram. This sculpture doesn't only portray the assemblage of two legends, but it symbolizes the virtues of 'Dhaarkari' and 'Waarkari'; Shivaji Maharaj bearing a weapon to annihilate the worldly enemy and Tukaram Maharaj showing the path of devotion to annihilate the enemy within. Both are guiding lights for the righteous following of Bhakti - Devotion & Surrendering, and Shakti – Strength & Courage.

Madanji and I extensively studied the history of Shivaji Maharaj and Sant Tukaram's 'Gatha' (Volume of devotional poetry) and references, bringing our idea to life in a small prototype. The committee unanimously accepted our proposal. Our deeply spiritual thought process, and the resulting sculpture, were much appreciated over other entries. We immediately started planning and working on the larger sculpture. It took us five years from 1995 to 2000 to complete the spectacular sculpture project.

Around this period, we were invited to Warnanagar to craft the statue of Udyog-Maharshi, pioneer of Warana Co-Operative and Educational Complex, Late Shri Tyatasaheb Kore. We envisioned a symbolic representation of his social accomplishments and the developments that took place in Warnanagar under his auspices, in a circular form around his full figure sculpture. This tremendously elevated the spirit of the sculpture. Our vision of adding an artistic touch to these professional assignments was highly appreciated by people from all walks of life and several fellow artists. Both sculptures were inaugurated in year 2000.

This was the prominent milestone of our career thus far. 'Bhakti-Shakti' sculpture can be seen from major roads in Pimpri-Chinchvad and Nigdi area.

**Gopal –** Right after the success of Bhakti-Shakti, you got an opportunity to design Mahatma Gandhi's sculpture to be placed in the City of Riverside, California in United States. Can you tell us about that experience?

**Arunatai –** Yes, sure. Few people from an Indian community associated with this project visited our studio. They shot few video clips and also narrated their idea of the sculpture. They were looking for something more than just a figurine. They wanted the sculpture to reflect Gandhiji's life, philosophy and teachings. They were impressed by few ideas we sent them and invited us to visit Riverside with the prototypes. Madan and I had five meetings with different entities associated with this project. One of the prototypes was confirmed at our final meeting with the mayor of Riverside. Today the 9 ft bronze statue of 'Gandhi Memorial' stands tall in the downtown area of Riverside, California. We visited museums and art galleries in selected cities during this trip. This visit to US and Canada turned out to be very enriching and educational for us in many ways.



**Gopal –** Your beautiful journey was unexpectedly ceased by an unfortunate accident which claimed Garge Sir's life, and left you severely injured. Garge Sir's untimely departure left a huge void in the Nation's art world. In spite of the irreversible personal loss, you rose above the bereavement and shouldered the Studio's responsibility with your son, Shreyas and your two nephews Mandar and Milind. Your courage is indeed inspiring. You are a painter by training but you mostly worked on sculptures. I would like to know about your personal thoughts about art. What are your feelings in retrospect?



**Arunatai –** Yes, I am a painter by education but turned sculptor by profession. I was geared to paint after completing the education, but after marrying a sculptor my focus shifted due to the added responsibilities of the studio. I often wondered when would I start painting? Madan always commented at my question that do it after retirement, but I haven't retired till date.

Painting and sculpting are independent art forms. The main difference is, painting is two-dimensional, one can only skillfully bring the sense of the third dimension in a painting, but the sculpture is a three-dimensional art form which can be seen in 360 degrees, so each detail is extremely important. Looking from a painter's perspective, a sculpture is a drawing in 360 degrees! When drawings from all angles come together, they form a sculpture.



**Gopal –** You both mostly worked on commercial or professional assignments. An exceptional artistic awareness along with fineness and an aesthetic approach is observed in your work. How do you manage to bring the art and worldly elements together in your expression?

**Arunatai –** These are very important points. Madan Garge had a great sense of beauty and aesthetics. He was keen about making his life sculptures beautiful and elegant. He focused on bringing out that beauty as tastefully as possible through the posture. I enjoyed working on energetic and inspirational themes. When we worked together on a project, I made the 'blocking' with clay. Madan Garge then developed it further to his taste.

Final mould was cast only when he was satisfied with the clay model. Being a man, he was naturally inclined towards enhancing feminine features while I was attracted to the masculine qualities like strength and physique; Of course, this was purely from an artistic viewpoint. We were aware of the responsibility of producing socially appropriate works, however our work definitely evolved with the union of opposite but complementary qualities.

In a broader perspective a sculpture is like a time capsule. When a sculpture is excavated which may have been concealed for centuries, its timeless classic values have the ability to connect and have a dialog with the beholder without any language barrier obstructing. There are countless such examples.






When sculptures are imaginatively used to express the eternal values, they will surely transcend the time and space to become timeless classics.

**Gopal –** Arunatai, your insight shall make the younger generation of sculptors to infuse this thinking in their creative pursuits. You have continued working in the studio with the third generation of 'Garges' by your side. I also want to mention that your son Dr. Tejas garge is an accomplished archeologist and currently serving as a Director at the Directorate of Archaeology & Museums, for the ministry of Cultural Affairs, Government of Maharashtra. Garge Sir and your contribution to the art will always remain inspirational to the future generation of sculptors. What are you planning to do next?

**Arunatai –** A true artist is never really satisfied. His or her quest of artistic perfection is endless. The destination is elusive.

I have a strong desire to learn more about Indian style sculptures. There is no education system to support this at the moment. I hope such system is developed but it will require a huge effort and energy.

**Gopal –** Arunatai, I sincerely thank you on behalf of the Ravi Paranjape Foundation for having an insightful dialog with me today in loving memory of Madan Garge Sir. Heartiest congratulations to The Garge Studio for successfully completing one hundred years, and wishi ng you the best of health for many more fulfilling years ahead.











Visual Melody

Life & Art of Painter-Illustrator Ravi Paranjape



# RETROSPECTIVE EXHIBITION

## 1958 - 2022

Illustrious career span

## 20–26 JUNE 2023

## 11 AM – 7 PM

'Visual Melody', a retrospective exhibition of Raviji's exquisite collection of beautiful paintings, illustrations and a wide range of studies is a humble tribute to Raviji; and a rare treat to witness the evolvement of a great artist.

Venue:
Jehangir Art Gallery 161B,
Mahatma Gandhi Road, Kala Ghoda, Fort,
Mumbai, Maharashtra - 400001

Contact:
+91 94 23 562 530 | +91 98 81 104 284

RAVI PARANJAPE FOUNDATION
A Foundation for Art & Education and
A Forum for the Design-Based Culture

abhijatkala@gmail.com | www.raviparanjape.org

# द रवी परांजपे फाउंडेशनचा वृत्तांत

नमस्कार

या अंकातून गार्गे आर्ट स्टुडिओ च्या रंजक सफरीचा आनंद आपण घेतला असलाच. रवी परांजपे फाउंडेशन आणि स्टुडिओ ची दुसरी तिमाही संपताना काही नव्या उपक्रमांचाही प्रारंभ होतो आहे.

**असा आहे फौन्डेशनचा त्रैमासिक आढावा**

- चित्रकार आणि नावाजलेले कला शिक्षक श्री. मारुती पाटील यांच्या व्हिजुअल मेलडीच्या विशेषांकाला रसिकांचा अनेक देशातून उत्तम प्रतिसाद मिळाला.
- फेब्रुवरी 2023 मधे सुरू केलेल्या ऑइल पेंटिंग च्या शॉर्ट कोर्स ला मिळालेल्या उत्तम प्रतिसादामुळे हा कोर्स कायम स्वरूपी चालू करण्याचा निर्णय घेतला गेला.
- संडे स्केच क्लब ला उत्कृष्ट प्रतिसाद मिळतो आहे! क्लब ने अलीकडे पहिलं स्टुडिओबाहेरचं सत्र आयोजित केलं.
- क्लबच्या कक्षा आता स्टुडिओच्या जागेबाहेरही रूंदावत आहेत. अनेक व्यावसायिक आणि हौशी कलाकार क्लबच्या WhatsApp ग्रुप च्या माध्यमातून एकत्र येऊन आपली चित्र शेयर करतात.
- सुप्रसिद्ध सुलेखनकार प्रकाश जोशी यांनी देवनागरी सुलेखन आणि English Calligraphy अशा दोन अप्रतिम कार्यशाळा आयोजित केल्या.
- पेंटर-illustrator रवीजींच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त, जहांगीर आर्ट गॅलरी मुंबई येथे त्यांच्या चित्रांचा आणि अनेक न पाहिलेल्या चित्रकृतींचा खजिना पाहण्याची संधी रसिकांना मिळणार आहे. हे प्रदर्शन 20 ते 26 जून, 2023 या दरम्यान भरवण्यात येणार आहे.
- ताज्या घडामोडी आणि कार्यक्रमांच्या माहितीसाठी www.facebook.com/theraviparanjapestudio या पानाला जरूर भेट द्या.
- व्हिजुअल मेलडी ची माहिती तुमच्या नातेवाईकांना, मित्रपरिवाराला नक्की द्या आणि अंकाला सबस्क्राइब करायला ही लिंक जरूर पाठवा www.bit.ly/rpfvisualmelody. आम्ही फक्त अंक आणि फौन्डेशनच्या उपक्रमांसंबंधी माहिती पाठवतो, आणि आपली माहिती इतर कोणालाही देत नाही.

**द रवी परांजपे फौन्डेशन**
The Ravi Paranjape Foundation
1, Rutika Apartments, 1098/5A,
Model Colony, Shivajinagar,
Pune - 411016

www.raviparanjape.org

# *Glimpses of past and future activities of 'The Ravi Paranjape Foundation.'*

*Hello!*

*What an exciting ride through 'Garge Art Studio'. This issue of Visual Melody marks the end of the second quarter of Ravi Paranjape Foundation and Studio's activities, and the beginning of some fantastic new initiatives.*

***Here is a quarter-at-a-glance at Ravi Paranjape Foundation & Studio***

- *Last issue of Visual Melody published on March 1, 2023, featured painter and educator Shri Maruti Patil's life and work. This issue received a great response from all around the globe.*

- *The short course of 'Landscape in Oil' began in February 2023 has been established as a continued activity due to popular demand.*

- *We are so pleased that the 'Sunday Sketch Club' is growing in size and popularity beyond our expectations. The club hosted its first off-site sketching adventure this quarter.*

- *'Sunday Sketch Club is expanding beyond the physical boundaries of the studio. Several people are joining the club's WhatsApp group and exchanging their work. All interested in sketching and drawing are welcome to join the 'Sunday Sketch Club' regardless of their skill level.*

- *Two unique Calligraphy workshops – Devnagari Calligraphy and English Calligraphy - were held at the studio by artist and well-known Calligrapher Prakash Joshi at the Ravi Paranjape Studio. We are working on bringing back these workshops again.*


- *A grand retrospective exhibition of paintings and plenty of unseen works and studies are being exhibited at the Jehangir Art Gallery in Mumbai, in loving memory of Painter-Illustrator Raviji Paranjape on the occasion of the first anniversary of his passing from June 20 to 26, 2023.*

- *We have exciting events coming up throughout the year. Visit our Facebook page at www.facebook.com/theraviparanjapestudio for the latest announcements.*

- *Recommend Visual Melody to your friends, family, fellow artists, and art enthusiasts. Feel free to share this subscription link: www.bit.ly/rpfvisualmelody. We don't spam or share contact information.*

*The Ravi Paranjape Foundation*
*1, Rutika Apartments, 1098/5A,*
*Model Colony, Shivajinagar,*
*Pune - 411 016*

www.raviparanjape.org




Compliments from

**RAVI PARANJAPE FOUNDATION, Pune**

For latest events please visit :

www.facebook.com/theraviparanjapestudio

Email: abhijatkala@gmail.com